**ठळक बातम्या**

- महानगरपालिका निवडणुकांमध्ये भाजपा सर्वात मोठा पक्ष, २९ पैकी २५ ठिकाणी सत्ता स्थापन करण्याची तयारी असल्याचा मुख्यमंत्र्यांना विश्वास

- मुंबईत ठाकरे बंधू तर पुण्यात पवार कुटुंब मोठा करिश्मा दाखवण्यात अपयशी

- ५ ठिकाणी सत्ता स्थापन करण्याचा काँग्रेसचा दावा

- लातूरमध्ये काँग्रेस आणि वंचित, वसई-विरारमध्ये बहुजन विकास आघाडी आणि मालेगावात इस्लाम पार्टी आघाडीवर

**आणि**

- राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी आजपासून अर्ज भरायला सुरुवात

**<><><><><>**

आतापर्यंत आलेल्या निकालानुसार **बृहन्मुंबई** महानगरपालिकेत भाजपा आणि शिवसेना महायुतीला निर्णायक आघाडी मिळणार हे आता स्पष्ट झालं आहे. आतापर्यंत हाती आलेल्या निकालानुसार भाजपा ७० जागांवर तर शिवसेना २१ जागांवर विजयी झाली आहे.  दुसरीकडे उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला ४८ जागांवर तर राज ठाकरे यांच्या पक्षाला केवळ ५  जागांवर यश मिळालं आहे. काँग्रेसने १९ जागा जिंकल्या.

**ठाणे** महानगरपालिकेत शिवसेना ३४, भाजपा १७, राष्ट्रवादी काँग्रेस ४ ठिकाणी विजयी झाले आहेत. मात्र, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि मनसे आघाडीच्या पदरी सपशेल निराशा पडली. उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला आतापर्यंत आलेल्या माहितीनुसार केवळ एक जागा मिळाली आहे तर मनसेला

भोपळाही फोडता आला नाही. दुसरीकडे काँग्रेसने पाच, शरद पवार यांच्या पक्षाने पाच आणि अजित पवार यांच्या पक्षाने चार जागा जिंकल्या आहेत.

**कल्याण डोंबिवली**त भाजपाने ३२ तर शिवसेनेने २९ ठिकाणी विजय मिळवला आहे.

**नवी मुंबई**मधे भाजपा ५१ जागा जिंकत भाजपा सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. त्यांच्या खालोखाल शिवसेनेला ३७ जागा जिंकण्यात यश मिळालं.

**भिवंडी निजामपूर** मधे काँग्रेसने तीस जागा जिंकल्या आहेत. भाजपाने २२ तर शिवसेनेने १२ ठिकाणी विजय मिळवला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षालाही बारा ठिकाणी यश मिळालं आहे.

**वसई विरार**मधे बहुजन विकास आघाडीने महानगरपालिकेची सत्ता कायम राखली आहे. इथं भाजपाला ४३ जागा जिंकण्यात यश मिळालं आहे तर शिवसेनेला आतापर्यंत केवळ एक जागा जिंकता आली.

**पनवेल** मधे ५५ जागा तर मीरा भाईंदरमधे ७८ जागा जिंकत भाजपाने निर्विवाद वर्चस्व सिद्ध केलं आहे. पनवेलमधे काँग्रेसला चार, शिवसेनेला दोन, राष्ट्रवादी काँग्रेसला दोन जागा जिंकता आल्या.

मीरा भाईंदरमधे काँग्रेसने तेरा जागा जिंकल्या आहेत तर शिवसेनेला तीन जागांवर यश मिळालं आहे.

**उल्हासनगर**मधे स्वबळावर लढलेल्या शिवसेनाला ३४ जागांवर विजय मिळाला आहे. तर पप्पु कलानी यांच्यासोबत आघाडीत असलेल्या भाजपाने २२ जागा जिंकल्या आहेत.

**<><><><><>**

१६५ जागांच्या **पुणे** महानगरपालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्षानं निर्णायक आघाडी घेतली असून एकहाती सत्ता स्थापन करण्याचा पक्षाचा मार्ग

मोकळा झाला आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा, सत्तास्थापनेसाठी आवश्यक असणारी ८३ जागांचा आकडा भाजपनं पार केला आहे.

**पिंपरी-चिंचवड** महानगरपालिका निवडणुकीतही भाजपाला स्पष्ट बहुमत मिळत असल्याचं चित्र आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा ३२ प्रभागातल्या १२८ जागांपैकी ८५ जागांवर भाजपा, तर ३० जागांवर आघाडीवर आहे. शिवसेनेनं ७ जागांवर आघाडी घेतली आहे.

दोन्ही ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष एकत्र आले असले तरी त्यांना फार मोठे यश मिळवता आलेलं नाही.

८१ जागांच्या **कोल्हापूर** महानगरपालिकेत महायुतीनं एकंदर ४५ जागा जिंकून स्पष्ट बहुमत मिळवलं. भाजपानं २६, शिवसेनेनं १५ आणि राष्ट्रवादी काँग्रेसनं ४ जागांवर विजय मिळवला. काँग्रेसला ३४, तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला एका जागेवर समाधान मानावं लागलं. जनसुराज्य शक्ती पक्षाला १ जागा जिंकता आली. इथं एकंदर ३२७ उमेदवार रिंगणात होते.

स्वतंत्र महानगरपालिका झाल्यानंतरच्या या पहिल्याच निवडणुकीत राज्यात सर्वाधिक, म्हणजे ६९ टक्के मतदान **इचलकरंजी** इथं झालं होतं. यात ६५ पैकी ४३ जागा जिंकत भाजपानं एकहाती विजय मिळवला. शिवशाहू आघाडीला १७, शिवसेनेला ३, ठाकरेंच्या शिवसेनेला १, राष्ट्रवादी काँग्रेसला १ जागा मिळाली. यामुळे इचलकरंजीत महायुतीची सत्ता येणार, हे स्पष्ट झालं आहे.

**अहिल्यानगर** महापालिकेची निवडणूक भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेसनं एकत्रितपणे लढवली होती आणि या युतीनं एकंदर ६८ जागांपैकी ५२ जागांवर विजय मिळवला. राष्ट्रवादी २७ जागा मिळवून सर्वात मोठा पक्ष ठरला, तर भाजपानं २५ जागा जिंकल्या. स्वतंत्र लढलेल्या शिवसेनेला १० जागांवर समाधान मानावं लागलं. काँग्रेसला २, एमआयएमला २, ठाकरेंच्या शिवसेनेला १, तर बहुजन समाज पक्षाला १ जागा मिळाली. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला एकही जागा

जिंकता आलेली नाही. या यशाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचं दूरध्वनीवरून अभिनंदन केलं.

**सोलापूर** महानगरपालिकेच्या १०२ जागांपैकी भाजपानं ८६ जागांवर विजय मिळवला. या निवडणुकीत भाजपा स्वबळावर लढली होती. एमआयएमला ८, शिवसेनेला ४, राष्ट्रवादी काँग्रेसला १ तर काँग्रेसला १ जागा मिळाली. या निवडणुकीत ठाकरेंची शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला एकही जागा जिंकता आली नाही.

**सांगली-मिरज-कुपवाड** महानगरपालिकेच्या ७८ जागांपैकी ३९ जागांवर भाजपाची सरशी झाली. काँग्रेसला १८, राष्ट्रवादी काँग्रेसला १६, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला ३, तर शिवसेनेला २ जागा मिळाल्या. ठाकरेंची शिवसेना, मनसे आणि अपक्षांना एकही जागा मिळवता आली नाही.

**आतापर्यंत हाती आलेल्या बातमीनुसार नागपूर** महानगरपालिकेच्या एकूण १५१ जागांपैकी भाजपा १०४ जागांवर आघाडीवर असून काँग्रेसच्या उमेदवारांनी ३३ जागांवर आघाडी घेतली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस ७ तर शरद पवार यांचा पक्ष एका जागेवर  आघाडीवर आहेत. उद्धव ठाकरे यांच्या पक्षानं२ जागांवर आघाडी घेतली आहे. नागपूर महानगर पालिका निवडणुकीत आम आदमी पार्टी, एम आय एम आणि मनसेचे उमेदवार एक एक जागेवर आघाडीवर आहेत

अमरावती महानगरपालिकेच्या एकूण २२ प्रभागातील ८७ जागांपैकी आतापर्यंत ६४ जागांचे निकाल घोषित झाले आहेत. भाजपानं २१ जागांवर विजय मिळवला असून राष्ट्रवादी काँग्रेसनं १३ जागांवर विजय मिळवला आहे. काँग्रेस पक्षानं १४ जागांवर विजय मिळवला आहे. उद्धव ठाकरे यांच्या पक्षानं ३ तर शिवसेनेनंही ३ जागा मिळवल्या आहेत. एमआयएमनं ६ जागा पटकावल्या असून युवा स्वाभिमानी पक्षाचे ३ उमेदवार विजयी झाले आहेत. इतर जागांसाठीची मतमोजणी सुरु असून

अमरावतीत भाजपा राष्ट्रवादी बरोबर महापौरपदावर दावा दाखल करण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

**अकोला** महानगरपालिकेच्या २० प्रभागांमधल्या एकूण ८० जागांचेही निकाल घोषित झाले असून भाजपानं सर्वाधिक ३६ जागांवर विजय मिळवला आहे. काँग्रेस पक्ष २१ जागां मिळवत दुसऱ्या स्थानावर आहे. उद्धव ठाकरेंच्या शिवसेने◌ेनं ७ तर शिवसेनेनं २ जागांवर विजय मिळवला आहे. वंचित बहुजन आघाडीनं ५, एमआयएमनं ३, राष्ट्रवादी काँग्रेसनं २ तर शरदचंद्र पवार पक्षानं २ जागा मिळवल्या आहेत. १ जागा महानगर विकास आघाडीनं तर एका जागेवर अपक्ष उमेदवार विजयी झाले आहेत. भाजपात आता महापौरपदाच्या हालचाली तीव्र झाल्या आहेत. **चंद्रपूर** महानगरपालिकेच्या एकूण १७ प्रभागातल्या ६६ जागांसाठी निवडणूक झाली. काँग्रेस जनविकास सेना या मित्रपक्षासह २० जागांवर विजय मिळवला असून भाजपानं १६ जागां मिळवल्या आहेत. एमआयएम, बसपा आणि वंचित बहुजन आघाडीचा प्रत्येकी १ उमेदवार विजयी झाला आहे.

**<><><><>**

मराठवाड्यात लातूर, परभणी महापालिका वगळता उर्वरित सात महापालिकांमध्ये भाजपने स्पष्ट बहुमत मिळवलं आहे.

**छत्रपती संभाजीनगर** महापालिकेत २९ प्रभागांमधल्या ११५ जागांपैकी ५२ जागांवर भाजप विजयी झाला आहे. शिवसेनेला १४ जागांवर विजय मिळाला. तर एमआयएम २४ जागांवर विजयी ठरला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष ६ जागांवर विजयी झाला असून वंचित बहुजन आघाडी ४ तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला अवघ्या एका जागेवर विजय मिळाला. **जालना** महापालिकेच्या निवडणुकीत भाजपाने १६ प्रभागांमधल्या ६५ पैकी ४१ जागांवर विजय मिळवून स्पष्ट बहुमत मिळवलं आहे. शिवसेनेला १२ जागांवर, काँग्रेसला ९ जागांवर विजय मिळाला आहे. एक अपक्ष उमेदवारही निवडून आला आहे. काँग्रेसचे माजी आमदार कैलास गोरंट्याल यांचा भाजपामध्ये प्रवेश हा या निवडणुकीत

निर्णायक ठरला. तर दुसरीकडे २ जागांवर विजय मिळवून एमआयएमने आपलं खातं उघडलं आहे. **नांदेड वाघाळा** महापालिकेत २० प्रभागांमधल्या ८१ जागांपैकी ४५ जागांवर भाजपने स्पष्ट बहुमत मिळवलं. महापालिकेच्या स्थापनेपासून पहिल्यांदाच भाजप सत्तेत आला आहे. काँग्रेसला १० तर एमआयएमला १५ जागा मिळाल्या आहेत. वंचित बहुजन आघाडीने ५ जागांवर विजय मिळवला असून शिवसेनेला चार जागा तर राष्ट्रवादी काँग्रेसला एका जागेवर विजय मिळाला आहे. **परभणी** महापालिकेत १६ प्रभागांमधल्या ६५ जागांपैकी शिवसेना उद्धव बाळासाहेब पक्षाने २५ जागांवर विजय मिळवला आहे. काँग्रेस १३ जागांवर विजयी झाला आहे. भाजपला १२ जागांवर तर राष्ट्रवादी काँग्रेसला १० जागांवर विजय मिळाला आहे. तसंच ५ अपक्ष उमेदवारही निवडून आले आहेत. **लातूर** महापालिकेत १८ प्रभागांमधल्या ७० जागांपैकी ४३ जागांवर काँग्रेसचे उमेदवार विजयी झाले आहेत. भाजपाला २२ जागांवर तर अपक्षांना ४ जागांवर विजय मिळाला आहे.

**धुळे** महापालिकेत १९ प्रभागांमधल्या ७४ जागांपैकी भाजपने ५० जागांवर विजय मिळवला असून शिवसेनेला अवघ्या ५ जागांवर विजय मिळाला आहे. एमआयएम १० जागांवर, राष्ट्रवादी काँग्रेस ८ तर एका जागेवर अपक्ष निवडून आला असून महाविकास आघाडीला या महापालिकेत एकाही जागेवर विजय मिळालेला नाही. **जळगाव** महापालिकेत १९ प्रभागांमधल्या ७५ जागांपैकी ४० जागांवर भाजपने विजय मिळवला आहे. शिवसेनेला १६ जागांवर विजय मिळाला असून राष्ट्रवादीला एका जागेवर विजय मिळाला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला ५ जागांवर विजय मिळाला.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी राज्यातल्या जनतेचे आभार मानले आहेत. राज्यातल्या उत्साही जनतेने एनडीएच्या जनहितकारी आणि सुशासनाच्या

अजेंड्याला आशीर्वाद दिले आहेत. हा कौल प्रगतीला अधिक गती देणारा , राज्याशी जोडलेल्या गौरवशाली संस्कृतीचा उत्सव साजरा करणारा आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी समाज माध्यमांवर दिली आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांच्यासह इतर मान्यवरांनी या विजयाबद्दल जनतेचे आभार मानले आहेत.

जनतेचा कौल हा सर्वोच्च आहे आणि तो आम्ही पूर्ण आदरानं स्वीकारतो, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या या निवडणुकीत जिथं अपेक्षित यश मिळालं नाही, तिथं जनतेचा विश्वास पुन्हा मिळवण्यासाठी आम्ही अधिक जबाबदारीनं, प्रामाणिकपणे आणि दुप्पट जोमानं काम करत राहू, असं अजित पवार म्हणाले.

**<><><><>**

राज्यातल्या २९ पैकी २५ महापालिकांमध्ये भाजपा किंवा महायुतीचा महापौर येईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज व्यक्त केला. महापालिका निवडणुकांच्या निकालानंतर मुंबईत भाजपा कार्यालयात आयोजित सोहळ्यात ते बोलत होते. मुंबईतही महायुतीचाच महापौर असेल, असा दावा त्यांनी केला. विकासाच्या अजेंड्याला जनतेनं पाठिंबा दिला आहे. तोच अजेंडा पुढे नेऊन शहरांचा विकास करायचा असल्याचं ते म्हणाले.

**<><><><>**

मुंबई महानगरपालिकेत काँग्रेसला समाधानकारक यश मिळालं नसलं तरी जनतेचा विश्वास आणि कार्यकर्त्यांचा निर्धार या जोरावर काँग्रेस राज्यातला दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष बनला असल्याची प्रतिक्रीया काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ

यांनी बुलढाणा इथं बोलताना दिली. या निवडणुकांमधे काँग्रेसचे एकूण साडेतीनशे नगरसेवक आणि ५ शहरांमधे महापौर असतील असं ते म्हणाले.

<><><><><>

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी आजपासून अर्ज भरायला सुरुवात झाली. या टप्प्यात पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशिव, लातूर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या १२ जिल्हा परिषदांच्या आणि त्या जिल्ह्यातल्या पंचायत समित्यांसाठी निवडणुका होणार आहेत.

२१ जानेवारीपर्यंत ऑफलाईन पद्धतीने यासाठी अर्ज भरता येतील. २२ जानेवारीला अर्जांची छाननी होईल आणि २७ जानेवारीपर्यंत अर्ज मागे घेता येतील.

<><><><><>

महिलांसाठी ‘मेनोपॉज क्लिनिक’ सुरू करणारे महाराष्ट्र हे देशात पहिलं राज्य ठरलं असल्याचं, सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी म्हटलं आहे. राज्यातल्या सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये ‘मेनोपॉज क्लिनिक’ सुरू करण्यात आलं आहे. प्रत्येक महिलेला या काळात योग्य सल्ला, उपचार आणि सन्मान मिळावा, हाच यामागचा उद्देश असल्याचं बोर्डीकर यांनी सांगितलं.

<><><><><>

ज्ञान घेण्यासाठी विदेशात जा, पण त्या ज्ञानाचा भारतासाठी वापर करा, असं आवाहन सरसंघचालक डॉ.मोहन भागवत यांनी युवकांना केलं आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त छत्रपती संभाजीनगर इथं एमआयटी महाविद्यालयात झालेल्या युवा संमेलनात भागवत बोलत होते. भागवत यांनी यावेळी प्रश्नोत्तराच्या माध्यमांतून युवकांशी संवाद साधला. देवगिरी प्रांत संघचालक अनिल भालेराव, विभाग संघचालक मुंजाजी जगाडे यावेळी उपस्थित होते. दरम्यान, आज गंगापूर इथं होणाऱ्या हिंदू संमेलनातही डॉ भागवत मार्गदर्शन करणार आहेत.

**<><><><><>**

गेल्या २४ तासात संपूर्ण राज्यात हवामान कोरडं होतं. राज्यात सर्वात कमी तापमान गोंदिया ९ अंश सेल्सिअस नोंदलं गेलं.

येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**